10

# राजर्षी शाहु महाराज

**प्रा. बोराडे तानाजी रामभाऊ**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

**प्रा. शेंडगे संदिप संभाजी**
समाजशास्त्र विभाग,
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

आधुनिक महाराष्ट्राची जडण–घडण करण्यात ज्या महापुरूषांची नावे आहेत त्यात शाहूमहाराजांचे नाव फुलेंच्या नंतर घेतले जाते. महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक, राजकीय, शेतकरी, अस्पृश्य यांच्या उध्दाराचे खरे जनक म्हणून शाहू महाराजांना ओळखले जाते म्हणूनच वि.रा.शिंदे यांनी शाहू महाराजांबद्दल पुढील उद्‌गार काढले ''शाहू राजा नुसता मराठा नव्हता, ब्राम्हणेत्तर ही नव्हता तो नव युगातला सर्वांगपुर्व राष्ट्र पुरूष होता. तो महाराष्ट्राच्या इतिहासाचा एक स्वाभावीक तरंग होता.'' कानपुर येथील आखिल भारतीय कुर्मी क्षेत्रीय जातीय परिषदेत १९१९ मध्ये त्यांना ''राजर्षी'' ही पदवी दिली होती.

राजर्षी शाहूंचे मुळ नाव यशवंत. जन्म इ.स. १८७४ मध्ये कागलचे जाहगीरदार व कोल्हापूर संस्थानांचे रिजंट, आबासाहेब घाटगे यांच्या पोटी झाला. कोल्हापूर संस्थानांचे राजे चौथा शिवाजी यांच्या मृत्यूनंतर कोल्हापूरच्या गादीवर कोणी वारस नव्हता म्हणून राजर्षी शाहूंना कोल्हापूरच्या संस्थानिकांच्या विधवा पत्नी महाराणी आनंदी बाईला दत्तक दिले. १८८४ मध्ये दत्तक विधी झाला. त्यानंतर राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले (फ्रेजर) ते शरिराने धिप्पाड होते. उंची ५ फुट इंच होती. १८८१ मध्ये ते १७ वर्षाचे असताना बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांची मुलगी लक्ष्मी हिच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यावेळी लक्ष्मीचे वय अवघे ११ वर्ष होते.

२ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्याभिषक विधी झाला. तेव्हापासून मृत्यूपर्यंत (६ मे १९२२) एकूण २८ वर्ष कोल्हापूर संस्थानचे राजे होते. पूर्वी १९ एप्रिल ते ६ जून १८९४ पर्यत पन्हाळयावरच त्यांचा मुक्काम होता. या मुक्कामात त्यांनी ३०० जुन्या प्रकरणाचा निकाल देवून टाकला. प्रारंभीच्या दोन वर्षात त्यांनी अनेक लोक कल्याणकारी निर्णय त्यांनी घेतले व दोन वर्षात पुढील योजना अंमलात आणल्या.

१. वेठबिगारी पध्दत बंद केली.

२. कोल्हापूर रेल्वे स्टेशन जवळ 'शाहूपुरी' ही नवी वसाहत बसविली.

३. गुळाची नवी बाजारपेठ सुरू केली.

४. राजाराम कॉलेज मध्ये पदवीपर्यंत पूर्ण शिक्षण मिळण्याची व्यवस्था केली.

५. डोंगराळ व आदीवासी भागातील लोकांना राज्याच्या सेवेत घेतले.

६. राज्यातील उद्योगांची विस्तृत पाहणी करण्यात आली.

७. राज्याच्या मालकीच्या कुरणात गोर गरिबांच्या जनावरास चरण्यास मुभा दिली.

८. जनावरांसाठी दवाखाने सुरू केले.

९. राज्याच्या बांधकाम खात्यातील भ्रष्टाचार बंद केला.

१०. भास्करराव जाधव या ब्राम्हणेत्तर तरूणांची असिस्टंट सरसुभे या पदावर नियुक्ती केली.

दाजीराव अमृतराव विचारे यांची शेणॉय यांच्या जागेवर बांधकाम विभागाच्या प्रमुखपदी नेमणूक केली.

न्याय, महसुल व पोलिस खात्यात ब्राम्हण, नौकर वर्गाचे वर्चस्व होते. ते शाहू महाराजांच्या प्रयत्नाने कमी झाले.

**वेदोक्त प्रकरण**

वेदोक्त प्रकरण हे शाहूंच्या व महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक चळवळीत महत्वाचे आहे. या प्रकरणामुळे पुरोहितशाहीची समाजावरील पकड ढिली झाली. न. र. फाटक म्हणतात, ''या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ जिवंत ठेवली. लेले शास्त्री, लोकमान्य टिळक, कृष्णानंद सरस्वती, भारताचार्य वैद्य, विवेकशास्त्री घुले शास्त्री यांच्या वेदोक्ता बाबतच्या भूमिका भिन्न होत्या. तसेच सयाजीराव गायकवाड,

राजर्षी शाहु त्यांचे पाठीराखे सत्यशोधक यांच्याही वेदोक्ताबाबतच्या दृष्टीकोनातून पुरक होता. या प्रकरणी शाहू महाराजांनी योग्य निर्णय दिला. वेदोक्त प्रकरणी टिळकांनी शाहूंना विरोध केल्यामुळे या वादास राजकीय रंग चढला. इंग्रज अधिकाऱ्यांनी मध्यस्थी करून शाहूंना अनुकुल निर्णय दिला. या प्रकरणामुळे महाराष्ट्राचे राजकारण समाजकारण व अर्थकारण गढूळ झाले''

यापुर्वीही छत्रपती शिवाजी महाराज, सातारचे राजे प्रतापसिंह व बडोद्यात १८९६ मध्ये वेदोक्ताचा वाद निर्माण झाला होता. कोल्हापूरातील शिवाजी विद्यापीठात शाहू संशोधन केंद्राने ४०० पानांचा एक संग्रह डॉ.विलास संगवे यांच्या प्रस्तावनेसह सादर केला.

वेदोक्त प्रकरणाचे मूळ हिंदुच्या वर्णव्यवस्थेवर आधारित समाजरचनेत आहे. आर्य श्रेष्ठ व अनार्य कनिष्ठ आहेत. आर्यांनाच फक्त वेद पठनाचा अधिकार आहे अशी समजुत होती. वेद हे हिंदुचे सर्वश्रेष्ठ ग्रंथे ते मानव निर्मित नाहीत. ते अपौरूषेय आहेत. या वेदातील मंत्राप्रमाणे जे संस्कार केले जातात, त्यांना वेदोक्त म्हणतात. आर्यांच्या ब्राम्हण, क्षेत्रिय व वैश्य या तीन वर्णीयांना वेदोक्ताचा अधिकार होता. अनार्य म्हणजे क्षुद्र ते पुराणोक्त पध्दतीने आपले धार्मिक विधी करू शकत नव्हते.

## शाहू महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक कार्ये

### समाजिक कार्य

समाजिक सुधारणांचे सामाजिक कार्य हाती घेणारे छत्रपती शाहू महाराज हे भारतातील थोर राजे होते. आपल्या संस्थानातील बहुजन समाजाच्या उन्नतीचे कार्य त्यांनी केले.

### १. ब्राम्हणेत्तर चळवळ–

जेव्हा ब्राम्हण वर्गाने छत्रपती शाहु महाराजांचा वैदिक विधी पार पाडण्याच्या अधिकारास आव्हान दिले. तेव्हा ते फार अस्वस्थ झाले. परंपरेने हा विधी पार पाडण्याचा अधिकार केवळ द्विजजातींना (ब्राम्हण, क्षेत्रीय व वैश्य) होता. क्षुद्रांना नव्हता तसेच मराठा जात ही क्षेत्रीय की क्षुद्र याबाबत कोल्हापूरातील ब्राम्हण साशंक होते. त्यामुळे ब्राम्हणांनी वेदोक्त विधी पार पाडण्याचा अधिकार नाकारला. त्यामुळे हा अधिकार मोडीत काढून ब्राम्हणेत्तराची उन्नती घडवून आणण्याचा निर्धार केला. मराठा हे क्षत्रीय आहेत अशी जेव्हा खात्री पटली तेव्हा त्यांनी आपल्या राजवाड्यात हा विधी करण्याचा आदेश १९०१ मध्ये काढला. मराठा युवकांना वैदीक विधी पार पाडण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी पुरोहित शाळा स्थापन केली. या घटनेमुळे समाज दोन विभागात विभागला गेला व कोल्हापूरात ब्राम्हणेत्तर चळवळ सुरू झाली.

### २. कुलकर्णी वतनाचे उच्चाटन:

कुलकर्णी हा वतनदार असुन गावकारभार पाहण्याची जबाबदारी होती. हे पद अनुवंशिकतेने भरले. जाई हा अडथळा दूर करण्यासाठी १९१८ मध्ये हे पद अनुवंशिकतेने भरण्याची पध्दती नष्ठ केली. त्याऐवजी तलाठी पध्दती सुरू करण्याचा आदेश काढला. तलाठी या पदावर कनीष्ठ जातीतील लोकांची नेमणूक केली व कुलकर्णी वतनाची सत्ता नष्ठ करून या प्रथेचे निर्मूलन केले.

### ३. कनिष्ठ जातीची उन्नती

जाती व्यवस्थेमध्ये उच्च जातींनाच फक्त फायदे मिळत होते. कनिष्ठ जातींना यापासून वंचित रहावे लागत होते. १९०८ मध्ये कनिष्ठ जातींना शिक्षण देण्यासाठी संस्था स्थापन केली. वस्तीगृहे सुरू केली. तसेच शिक्षण चालू ठेवता यावे म्हणून शिष्यवृत्ती देणे सुरू केले. जातीच्या आधारे मुलांचे विभाजन करण्यास बंदी घातली. अस्पृश्यासाठीच्या वेगळया शाळा बंद केल्या.

कनिष्ठ जातींना त्रासदायक ठरणारी बलुता पध्दती १९१८ मध्ये नष्ठ केली. १९१९ मध्ये अस्पृश्यता पालनास बंदी घातली. नळ, विहीरी, धर्मशाळा, दवाखाने व सर्व सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यासाठी खुली केली. आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली व या विवाहाचा पुरस्कार केला. अस्पृश्यांच्या हातचे चहापान स्विकारून अस्पृश्यता न पाळण्याचा आदर्श घालुन दिला.

### ४. कनिष्ठ जातींना आरक्षण

शाहु महाराजांच्या काळात उच्च जातींना शिक्षण घेण्याचा अधिकार होता व कनिष्ठ जातींना हा अधिकार नाकारला होता. परिणामी उच्च जातींना प्रशासकीय सेवेत नोकऱ्या मिळत होत्या तर कनिष्ठांना अशिक्षित असल्यामुळे अशा नोकऱ्या मिळत नव्हत्या. अशा प्रकारची विषमता नष्ठ करण्यासाठी महाराजांनी २६ जुलै १९०२ मध्ये एक आदेश काढून शासकीय सेवेत ब्राम्हणेतरांना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. रिक्त

झालेल्या जागेवर ब्राम्हणेत्तर व्यक्तीची नेमणूक केली जाई. आपल्या राज्यात त्यांनी नागरी व लष्करी सेवेत अस्पृश्यांना नेमले.

**५. सत्यशोधक समाज व आर्य समाज यांची स्थापना**

महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर थंडावलेल्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे इ.स.१९११ मध्ये कोल्हापूरात पुनरूज्जीवन करून तिचे नेतृत्व केले. मराठा नेत्यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. १९१३ मध्ये कोल्हापूरात सत्यशोधक विद्यालय स्थापन करून एका धनगराच्या मुलास शिक्षक म्हणून नेमले म्हणून ते महात्मा फुलेचे खरे वारसदार ठरले.

शाहूमहाराज आर्य समाजाच्या कार्यानेही प्रभावित झाले होते. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात १९१८ मध्ये आर्य समाजाची स्थापना केली व राजाराम महाविद्यालय, ट्रेनिंग कॉलेज इ.शिक्षण संस्थांची जबाबदारी आर्य समाजावर सोपवली. शाहू महाराजांच्या मदतीने आर्य समाजाने सामाजिक व शैक्षणिक सुधारणा घडवून आणून मोठे योगदान दिले.

**६. लोकशाहीचे पुरस्कर्ते**

शाहु महाराजांचा समतावादी व वर्गविहीन समाजावर विश्वास होता. ते लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. १९१९ मध्ये कोल्हापूर नगरपालीकेचे प्रशासन निवडून आलेल्या प्रतिनिधीकडे (नगरसेवक) सोपवले. त्यात निवडून आलेले मागासवर्गीय प्रतिनिधीही होते. कुलकर्णी वतन नष्ठ केल्यानंतर ग्रामपंचायती स्थापन केल्या. मोफत व सक्तीच्या शिक्षणामुळे जातीव्यवस्थेने निर्माण केलेल्या समस्यावर मात करण्यात समर्थ बनविले. सर्व जातीतील सुशिक्षीत व्यक्तीच्या हाती राजकीय सत्ता सोपविण्यास उत्सुक होते. त्यामुळे या राज्यात लोकशाहीचा पाया घातला.

**७. शेती विकासास प्रोत्साहन**

शेतकऱ्यांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी व शेतीविकासासाठी त्यांनी भोगावती नदीवर राधानगरी नावाचे धरण बांधले. त्या काळात कुशल कामगार व तज्ञ अभियंते उपलब्ध नसतानाही हे धरण बांधले गेले. त्यांनी शेती क्षेत्रात काही नवीन प्रयोगही केले. नवीन कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यात लोकप्रिय करण्यासाठी १९२२ मध्ये 'किंग एडवर्ड कृषी संस्था' स्थापन केली. लोकांमध्ये शेती विषयी आवड निर्माण व्हावी म्हणून अनेक खेडयात कृषी विषयक यात्रा व प्रदर्शन आयोजित केली.

**शैक्षणिक कार्य**

कनिष्ठ जातीमध्ये असलेल्या शैक्षणिक मागासलेपणाची जाणीव होती. शिक्षणामुळे त्यांचा समाजातील दर्जा उंचावेल यावर त्यांचा विश्वास होता. ब्राम्हणेतर लोकांसाठी प्रशासकीय सेवेत राखीव जागा ठेवल्या तरी जो पर्यंत ते अशिक्षीत आहेत तो पर्यंत त्यांना नोकऱ्या देणे कठीण आहे म्हणून त्यांनी शिक्षणामध्ये विशेष रस घेतला.

**१. विशेष शाळा**

अस्पृश्यांना शिक्षण घेता यावे म्हणून प्रत्येक खेडयात विशेष शाळा स्थापन करून तेथे बहुसंख्यांक असलेल्या व्यक्तींना शिक्षक म्हणून नेमले. यामुळे अस्पृश्य बाजुला पडले जातील म्हणून १९१९ मध्ये या शाळा बंद केल्या. मुलांनी सरकारद्वारे चालविलेल्या सार्वजनिक शाळेत शिकावे यासाठी त्यांनी प्रोत्साहित केले. तसेच शिक्षकांनी उच्च कनिष्ठ असा भेद विद्यार्थ्यात त्यांनी करू नये असे सुचविले.

**२. मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण**

१९१३ मध्ये महाराजांनी प्रत्येक खेडयात शाळा असावी असा आदेश जारी केला.१९१८ मध्ये आदेश काढून प्राथमिक शिक्षण हे सर्वांसाठी मोफत व सक्तीचे केले. आपल्या शैक्षणिक कार्यास साहय मिळावे म्हणून सुस्थितीतील नागरीकाकडून कर गोळा केला बहुसंख्य समाजातील व्यक्तीची शिक्षक म्हणून नेमणूक केली. गावातील मंदीरे व चावडयांचा वापर शाळा भरवण्यासाठी केला.

**३. शिष्यवृत्ती आणि वस्तीगृहाची तरतुद**

१८९१–९२ मध्ये राजाराम महाविद्यालयात वस्तीगृह सुरू केले. १९०१ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाउस' या नावाने वस्तीगृह स्थापन केले. १९०८ मध्ये अस्पृश्यामध्ये शिक्षण प्रसार करण्यासाठी एक संस्था स्थापन केली. उच्च शिक्षणसाठी पास असणाऱ्या विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्त्या दिल्या. अस्पृश्य व दलितांचे पुरस्कर्ते असलेल्या व्हाइलेट क्लार्क यांच्या संपर्कात महाराज आले व त्यांच्या नावाने १९०८ मध्ये दलित विद्यार्थ्यासाठी वसतीगृह सुरू केले. अशाप्रकारे विविध

जातीसाठी कोल्हापूर, नगर, नाशिक, पुणे इ.शहरात २६ वसतीगृहे स्थापन केली. महाराजांच्या कार्याने प्रभावित होवून मराठा, जैन, मुस्लिम, लिंगायत, प्रभु या समुदयातील नेत्यांनी वसतीगृहे स्थापन केली. त्यामुळे कनिष्ठ जातीतील शिकणाऱ्या मुलांची संख्या वाढण्यास मदत झाली.

**४. इतर शाळा**

समाजउपयोगी शिक्षण देणाऱ्या शाळाही महाराजांनी सुरू केल्या.

**१. शिवाजी क्षत्रिय वैदिक शाळा**

मराठा जातीतील मुलांना पौरोहित्य कार्याचे धार्मिक विधी पार पाडण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी ही शाळा काढली.

**२. कुलकर्णी पाटील शाळा**

कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कार्याचे प्रशिक्षण देण्यासाठी ही शाळा सुरू केली.

**३. सैनिक शाळा**

नागरीकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक युध्द कलेचे शिक्षण देण्यासाठी ही शाळा सुरू केली.

**४. संस्कृत शाळा**

जातीपातीचा विचार न करता सर्वांना संस्कृत भाषा शिकवण्यासाठी ही शाळा काढली.

या सर्व शाळांनी विद्यार्थ्यांच्या प्राथमिक, तांत्रिक, धार्मिक, नैतिक इ.शिक्षणाची गरज पूर्ण केली.

**६. ब्राम्हणेतरांच्या वृत्तपत्रांना प्रोत्साहन**

शाहु महाराजांच्या काळात वृत्तपत्रेही पूर्णत: ब्राम्हणांच्या ताब्यात होती. ब्राम्हणाच्या वृत्तपत्रातील लेखनास आव्हान देण्यासाठी महाराजांनी ब्राम्हणेतरांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या अर्थसहय्यामुळेच डॉ.आंबेडकरांनी 'मुकनायक' हे साप्ताहिक प्रसिध्द केले.

अशाप्रकारे शाहु महाराजांनी कोल्हापूर संस्थानांच्या मार्फत संपूर्ण राज्यात लोकशाही आणण्याचा प्रयत्न केला व त्याचाच परिणाम म्हणून स्वातंत्र्यानंतर लोकशाही शासन स्थापन करतांना त्यांच्या विचाराचा फार मोलाचा उपयोग झाला. व त्यांच्या प्रेरणेनेच घटनेत अस्पृश्यांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या.

**संदर्भसुची**

१. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, डॉ.आर. एस.कोंडेकर, डॉ.एन.जी.भर्दे, प्रा.साईनाथ शेटोड चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद जून २०११

**11**

# छ. राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणीक धोरण

**प्रा.डॉ. शिला स्वामी**
इतिहास विभाग प्रमुख
माधवराव पाटील महाविद्यालय मुरूम,
ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

**डोंबाळे भरत सुदाम**
रा. साडेसांगवी, ता. भूम
जि. उस्मानाबाद

***********

महाराष्ट्राच्या जडण घडणीच्या इतिहासात राजर्षी शाहू महारांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे. इतर राज्यातील समाज दिर्घकाळ शिक्षणसत्ता, सामाजिक स्थान, प्रतिष्ठा या पासून वंचित राहिला परंतु महाराष्ट्रात हे झाले नाही. या बाबतीत महात्माफुले यांनी जागृती केली त्यानंतर परिवर्तन घडवून आणण्याचे काम कर्मवीर शिंदे शाहु महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील या पैकी शाहू महाराज राजे होते. त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग वंचीत अशा समाजाला शिक्षण देवून त्यांच्यात जाणीव जागृती निर्माण केली. १९ व्या शतकातील बहुजन समाज अज्ञान दारीद्र्यात अंधारात होता. बहुजन समाजात फक्त बोटावर मोजण्याइतकेच लोक मॅट्रीक पास होते गावागावामध्ये प्राथमिक शिक्षण शाळा नव्हत्या. बऱ्याच लोकांमध्ये शिक्षणाचा अभाव होता. त्यावेळेस त्यांना राजकीय गुलामगीरी जितकी खटकली तितकीच त्यांना शैक्षणिक गुलामगीरीही खटकली. त्या काळात शिक्षण शिकायचे तर फक्त उच्च वर्णीय लोकांनी, श्रीमंत, धनीक, जमीनदारांनी गरीब, दलीत स्त्रीयांनी शिकणे हा गुन्हा आहे असे त्या वेळी मानले जात. त्यावेळेस समाजात अंधश्रध्दा, धर्मभोळेपणा, खेडया पाडयापर्यंत पोहचलेला होता.



S.P. Mahavidyalaya, Bhoom Tq. Bhoom Dist O'bad BHOOM
PRINCIPAL
S.P. Mahavidyalaya, Bhoom
Dist Osmanabad